सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४

# महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५

(दिनांक ३ नोव्हेंबर,२००६ पर्यंत सुधारलेला)

**MAHARASHTRA ACT No. XLIV OF 1975**

# THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975

**(As modified upto the 3rd November 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : ७.३० रुपये ]

# महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रकरण एक** | |
| | प्रारंभिक | |
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ ... | १ |
| २. | व्याख्या ... | १ |
| | **प्रकरण दोन** | |
| | वृक्ष प्राधिकरणाची स्थापना व कार्यपद्धती | |
| ३. | वृक्ष प्राधिकरणाची स्थापना ... | २ |
| ४. | वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकी ... | ४ |
| | **प्रकरण तीन** | |
| | अधिकारी व कर्मचारी | |
| ५. | वृक्ष अधिकाऱ्याची नेमणूक ... | ४ |
| ६. | इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक ... | ४ |
| | **प्रकरण चार** | |
| | वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये | |
| ७. | वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये ... | ५ |
| | **प्रकरण पाच** | |
| | झाडे तोडण्यावरील निर्बंध आणि झाडे लावण्याचे व त्यांचे जतन करण्याचे दायित्व | |
| ८. | झाडे तोडण्यावरील निर्बंध ... | ६ |
| ९. | समुचित प्रमाणात झाडे लावण्यास फर्माविण्याचा अधिकार ... | ७ |
| १०. | पडलेल्या किंवा नष्ट झालेल्या झाडाऐवजी नवीन झाड लावण्यास फर्माविण्याचा अधिकार | ८ |
| ११. | झाडांचे जतन करण्याची जबाबदारी आणि आदेशांचे योग्यरीत्या पालन व्हावे म्हणून ठेव घेण्याचा अधिकार | ८ |
| १२. | झाडे दत्तक घेणे ... | ९ |
| १३. | वृक्षारोपणाच्या आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास ठेव सरकारजमा करणे आणि खर्च वसूल करणे. | ९ |
| १४. | अपिले ... | १० |

## अनुक्रमणिका--चालू

### प्रकरण सहा

वित्तव्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे


| | | | |
|---|---|---|---|
| १५. | वृक्ष प्राधिकरणाचा निधी | ... | १० |
| १६. | अर्थसंकल्प | ... | ११ |
| १७. | लेखे आणि लेखापरीक्षा | ... | ११ |


### प्रकरण सात

वृक्ष उपकर


| | | | |
|---|---|---|---|
| १८. | वृक्ष उपकर बसविणे व त्याची वसुली | ... | ११ |


### प्रकरण आठ

संकीर्ण


| | | | |
|---|---|---|---|
| १९. | वृक्ष अधिकाऱ्याच्या मान्यतेने जमिनीच्या विकासासाठी परवानगी देणे | ... | ११ |
| २०. | निदेश देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा अधिकार | ... | ११ |
| २०-क. | झाडे तोडण्यास किंवा त्यांस हानी पोहचविण्यास प्रतिबंध | ... | १२ |
| २०-ख. | या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी प्रवेश करण्याचा अधिकार | ... | १२ |
| २१. | अपराध व शास्ती | ... | १२ |
| २२. | नियम करण्याचा अधिकार | ... | १३ |

# सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४[१]

## [महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५]

## (१६ सप्टेंबर १९७५)

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ (८-१-१९७७)†

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (८-१-१९९६)†

**झाडे तोडण्याचे नियमन करून राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी अधिक चांगली तरतूद करण्याकरिता आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात नवीन झाडे लावण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** नागरीकरण आणि औद्योगीकरण यांच्या वाढत्या गतीमुळे महाराष्ट्र राज्याच्या नागरी क्षेत्रात झाडांची मोठ्या प्रमाणावर बेछूट तोड करण्यात येत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** झाडे तोडण्याचे नियमन करून राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे [२][संरक्षण व जतन] करण्यासाठी अधिक चांगली तरतूद करणे आणि त्या क्षेत्रात **समुचित** प्रमाणात नवीन झाडे लावण्याची तरतूद करणे व त्याच्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे [३][संरक्षण व जतन] अधिनियम, १९७५ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास कोणत्याही नागरी क्षेत्रात किंवा त्याच्या भागात अंमलात येईल ; आणि निरनिराळ्या नागरी क्षेत्रांसाठी किंवा त्यांच्या भागासाठी निरनिराळे दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,--

[४][ (१-क) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २२ अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला असा आहे;]

(क) ''झाडांचे जतन'' या शब्दप्रयोगात नवीन झाडे लावणे आणि [५][झाडे जिवंत राहण्यासाठी आणि त्यांच्या संख्येत वाढ होण्यासाठी इतर कामे करणे] यांचा समावेश होतो;

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७५, भाग पाच, पृष्ठ ५९६ पहावे.

२. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम २ द्वारे ''जतन करण्यासाठी'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे ''जतन'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे खंड क पूर्वी हा खंड समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम २ (अ) द्वारे ''दुसऱ्या जागी झाडांची रोपणी करणे'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

(ख) ''संबद्ध अधिनियम'' याचा अर्थ, ज्या अधिनियमान्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाची रचना करण्यात आली असेल तो अधिनियम असा आहे ;

(ग) ''झाड तोडणे'' या शब्दप्रयोगात, झाडे जाळणे, तोडणे, [१][किंवा कोणत्याही प्रकारे झाडास हानी पोचवणे] यांचा समावेश होतो ;

[२][(घ) ''झाड'' याचा अर्थ, बी किंवा रोपट्याच्या अवस्थेतील किंवा पूर्ण वाढ झालेल्या अवस्थेतील कोणतेही बारमाही काष्ठमय रोप असा आहे आणि त्यात, जमिनीच्या पातळीवरच फांद्या फुटणाऱ्या झुडपांचाही समावेश होतो] ;

(ङ) ''वृक्ष अधिकारी'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वृक्ष प्राधिकरणाने नेमलेला अधिकारी, असा आहे ;

(च) ''नागरी क्षेत्र'' याचा अर्थ, ज्या महानगरपालिका क्षेत्रासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याअन्वये ज्यासाठी महानगरपालिका घटित करण्यात आली आहे असे महानगरपालिका क्षेत्र किंवा नगरपालिका क्षेत्रासाठी, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये नगरपालिका घटित करण्यात आली आहे असे नगरपालिका क्षेत्र असा आहे आणि त्यामध्ये ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० अन्वये विशेष नगररचना प्राधिकरण घटित किंवा नेमणूक करण्यात आले आहे अशा अधिसूचित क्षेत्राचा किंवा ज्या नवीन नगरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३ अन्वये विकास प्राधिकरण घटित करण्यात आले आहे अशा नवीन नगराची जागा म्हणून निर्देशित करण्यात आलेल्या क्षेत्राचा समावेश होतो ;

(छ) कोणत्याही नागरी क्षेत्राच्या संबंधात ''नागरी स्थानिक प्राधिकरण'' याचा अर्थ, त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेली महानगरपालिका, नगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरण किंवा यथास्थिती विकास प्राधिकरण असा आहे ;

१९८८ चा मुंबई ३.
१९४९ चा मुंबई ५९.
१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.
१९६५ चा महा. ४०.
१९६६ चा महा. ३७.
१९६६ चा महा. ३७.

(ज) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु, व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संबद्ध अधिनियमात जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## वृक्ष प्राधिकरणाची स्थापना व कार्यपद्धती

वृक्ष प्राधिकरणाची स्थापना.

**३.** (१) कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यांमधून ते प्राधिकरण ठरवील अशारीतीने आणि अशा मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या, [३][अध्यक्ष आणि इतर यांसह] कमीत कमी पाच आणि जास्तीत-जास्त पंधरा व्यक्तींचे मिळून बनलेले एक वृक्ष प्राधिकरण घटित करील :

परंतु, कोणत्याही महानगरपालिकेसाठी किंवा नगरपरिषदेसाठी कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या प्रशासकाची नेमणूक करण्यात आली असेल त्याबाबतीत, तो, आपल्या नेमणुकीच्या काळात वृक्ष प्राधिकरण म्हणून कार्य करील आणि वृक्ष प्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडील.

---

[१]. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३]. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ५ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) खालील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत, त्याच्या वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष, त्याच्या स्तंभ (२) मध्ये त्याच्यासमोर विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती असेल :--

| | | नागरी स्थानिक प्राधिकरणाचे नाव<br>(१) | त्याच्या वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष<br>(२) |
|---|---|---|---|
| | १. | महानगरपालिका ... | महानगरपालिकेचा [1][आयुक्त]. |
| | २. | नगरपालिका ... | नगरपालिकेचा अध्यक्ष. |
| १९६६ चा महा. ३७. | ३. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० (१) (क) अन्वये घटित करण्यात आलेले विशेष नियोजन प्राधिकरण. | विशेष नियोजन प्राधिकरणाचा [2][मुख्य कार्यकारी अधिकारी]. |
| १९६६ चा महा. ३७. | ४. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३ (२) अन्वये घटित करण्यात आलेले नवीन नगर विकास प्राधिकरण. | नवीन नगर विकास प्राधिकरणाचा [3][मुख्य कार्यकारी अधिकारी]. |
| १९६६ चा महा. ३७. | ५. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३ (३-क) अन्वये जाहीर करण्यात आलेले नवीन नगर विकास प्राधिकरण किंवा त्या अधिनियमाच्या कलम ४० (१) (ख) अन्वये नेमण्यात आलेले विशेष नियोजन प्राधिकरण. | नवीन नगर विकास प्राधिकरण म्हणून जाहीर करण्यात आलेल्या महामंडळाचा किंवा कंपनीचा व्यवस्थापन संचालक. |

(३) प्रत्येक वृक्ष प्राधिकरणास ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रातले विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा, बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य म्हणून [4][नामनिर्देशित करता] येईल. परंतु अशा [5][नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.] हे सदस्य, [6][विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नामनिर्देशित] करण्यात येतील.

(४) वृक्ष प्राधिकरणातील कोणतेही रिकामे पद, ज्या सदस्यांच्या जागी नवीन नेमणूक करण्यात यावयाची असेल त्या सदस्याची नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, शक्य तितक्या लवकर भरील.

---

[1]. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ५ च्या कलम ५ (ब) (एक) द्वारे "महापौर" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2]. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (दोन) द्वारे "सभापती" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (तीन) द्वारे "सभापती" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4]. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) (एक) द्वारे "स्वीकृत करून घेता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5]. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) (दोन) द्वारे "स्वीकृत सदस्यांची संख्या तीनपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6]. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) (तीन) द्वारे "ठरविता येईल अशा रीतीने व अशा मुदतीसाठी स्वीकृत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकी. ४. [१][ (१) वृक्ष प्राधिकरणाची बैठक, प्रत्येक महिन्यात किमान एकदा अध्यक्ष ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळी घेण्यात येईल, परंतु त्याच्या लागोपाठच्या दोन बैठकींमध्ये पंचेचाळीस दिवसांचा कालावधी असणार नाही ].

(२) वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीसाठी गणपूर्ती, [२][नामनिर्देशित], सदस्य असल्यास, त्यांच्यासह, त्यांच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशाने होईल.

(३) [३][नामनिर्देशित] सदस्यांना वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीच्या वेळी मतदानाचा अधिकार असेल.

(४) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या बैठकीच्या कार्यपद्धतीचे नियम, योग्य त्या फेरफारांसह वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकींना लागू होतील.

## प्रकरण तीन
## अधिकारी व कर्मचारी

वृक्ष अधिकाऱ्याची नेमणूक. ५. (१) कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्यानंतर, शक्य तितक्या लवकर संबंधित स्थानिक नागरी प्राधिकरण, पोट-कलम (२) ला अधीन राहून, आपल्या एका किंवा अधिक अधिकाऱ्यांची या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करील.

(२) बृहन्मुंबईत, वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावयाचा कोणताही अधिकारी हा, प्रभाग अधिकाऱ्याहून कमी दर्जाचा असणार नाही व इतर नगरपालिका क्षेत्रात असा अधिकारी सहायक नगरपालिका आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात संबंधित नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी हा, वृक्ष अधिकारी असेल आणि त्या नगरपरिषदेस आपल्या एका किंवा अधिक इतर अधिकाऱ्यांची वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

(३) प्रत्येक वृक्ष अधिकारी, [४][वृक्ष प्राधिकरण] वेळोवेळी निश्चित करील अशा संपूर्ण नागरी क्षेत्रावर किंवा त्याच्या अशा भागावर अधिकारितेचा वापर करील.

इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक. ६. (१) नागरी स्थानिक प्राधिकरणास वेळोवेळी त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, वृक्ष अधिकाऱ्यास दुय्यम अशा इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल :

परंतु, नागरी स्थानिक प्राधिकरण हे, नगरपालिका असल्यास, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ यात, कर्मचारीवर्गाच्या नेमणुकीवर कोणतेही निर्बंध असले तरी, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी नगरपरिषद तिला आवश्यक वाटेल असा कर्मचारीवर्ग नेमण्यास सक्षम असेल. १९६५ चा महा. ४०.

(२) अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीच्या व सेवेच्या शर्ती आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये ही नागरी स्थानिक प्राधिकरणाकडून ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

---

[१]. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ६ (अ) द्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[२]. वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) द्वारे ''स्वीकृत'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३]. वरील अधिनियमाच्या कलम ६ (क) द्वारे ''स्वीकृत'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४]. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे ''नागरी स्थानिक प्राधिकरण'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण चार
## वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये

**७.** संबद्ध अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आणि राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण निदेशांस अधीन राहून, वृक्ष प्राधिकरण पुढील गोष्टींसाठी जबाबदार राहील :--. वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये.

(क) त्याच्या अधिकारितेतील सर्व जमिनींवरील सर्व झाडांचे [१][संरक्षण व जतन] करणे ;

[२][ (ख) [३][ डिसेंबर १९९६ पूर्वी एकदा आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षातून एकदा ], त्याच्या अधिकारितेतील सर्व जमिनींवरील विद्यमान झाडांची गणना करणे ;]

(ग) प्रत्येक भूखंडात जी असतील व लावण्यात येतील अशा झाडांची संख्या व प्रकार विनिर्दिष्ट करणारी मानके विहित करणे ;

(घ) नवीन झाडे लावू इच्छिणाऱ्या किंवा वृक्ष अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने तोडण्यात [४][ किंवा अनैच्छिकतेने उपटण्यात] आलेल्या झाडांऐवजी नवीन झाडे लावू इच्छिणाऱ्या व्यक्तींना बिया, रोपटी व झाडे यांचा पुरवठा करण्यासाठी रोपमळ्यांचा विकास व परिरक्षण करणे ;

(ङ) नवीन रस्ते बांधण्यासाठी किंवा अस्तित्वात असलेले रस्ते रुंद करण्यासाठी किंवा जीवित वा मालमत्ता यांना असलेल्या धोक्यापासून संरक्षण करण्यासाठी दुसऱ्या जागी लावणे आवश्यक झालेल्या झाडांचे प्रतिरोपण करणे ;

[५][ (च) फुले, फळे, भाज्या, झाडे किंवा रोपे यांची प्रदर्शने [६][ वर्षातून किमान एकदा ] आयोजित करणे आणि अशी प्रदर्शने आयोजित करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक संस्थांना सहाय्य करणे आणि झाडे व वनस्पती यांचे मानवी जीवनात जे महत्त्वाचे स्थान आहे त्याबद्दल लोकमत तयार करणे ; ]

(छ) [७][ झाडे लावणे, त्यांचे संरक्षण व जतन] यांच्याशी संबंधित कोणत्याही बाबीत ज्याला सल्ला वा सहाय्य हवे असेल अशा कोणत्याही व्यक्तीला सल्ला वा तांत्रिक सहाय्य देणे ;

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ८ (अ) द्वारे ''जतन'' या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ३ (अ) द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

३. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ८ (ब) द्वारे ''राज्य शासन निदेश देईल त्यानुसार वेळोवेळी'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८ (क) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३ (ब) द्वारे मूळ खंड (च) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

६. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ८ (ड) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ई) द्वारे ''वृक्षारोपण व त्यांचे जतन'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ज) विहित मानकानुसार त्यास आवश्यक वाटत असतील तितकी झाडे [१][रस्त्यांच्या कडेने,] सार्वजनिक उपवनात आणि उद्यानात आणि नदीच्या किंवा तलावाच्या काठावर किंवा [२][समुद्र किनाऱ्यावर, टेकड्यांवर, मोकळ्या जागांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी] लावणे व त्यांचे परिरक्षण करणे ;

(झ) या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर कोणत्याही योजना किंवा उपाययोजना हाती घेणे.

## प्रकरण पाच

## झाडे तोडण्यावरील निर्बंध आणि झाडे लावण्याचे व त्यांचे जतन करण्याचे दायित्व

झाडे तोडण्यावरील निर्बंध. ८. (१) कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिनांकाला व त्या दिनांकानंतर त्यावेळी अंमलात असलेली कोणतीही रूढी, परिपाठ, करार किंवा कायदा यात काहीही अंतर्भूत असले तरी कोणीही व्यक्ती वृक्ष अधिकाऱ्यांच्या पूर्व-परवानगीखेरीज त्या नागरी क्षेत्रातील कोणत्याही, तिच्या स्वत:च्या मालकीच्या किंवा अन्य जमिनीतील झाड तोडणार नाही किंवा तोडण्यास कारणीभूत होणार नाही.

(२) [३][ नागरी स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी किंवा राज्य सरकारचा किंवा केंद्र सरकारचा अधिकारी यांसह कोणत्याही व्यक्तीने झाड तोडावयाचे योजल्यास] ती त्याबाबतीत परवानगीसाठी [४][वृक्ष प्राधिकरणाकडे] लेखी अर्ज करील. अर्जासोबत, जे झाड तोडावयाचे असेल [५][त्या झाडाचे वर्णन व] स्थिती दर्शविणारा जागेचा नकाशा आणि ते झाड तोडण्याची कारणे जोडील.

[६][ (३) (क) असा अर्ज मिळाल्यावर, वृक्ष प्राधिकरण वृक्ष अधिकाऱ्यास, झाडांचे व्यक्तिशः निरीक्षण करण्यास, आणि असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत चौकशी करून वृक्ष प्राधिकरणाकडे अहवाल सादर करण्यास सांगेल, वृक्ष अधिकारी, स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन व तसेच तोडणे आवश्यक असलेल्या झाडांच्या ठळक भागावर नोटीस चिकटवून योग्य ती जाहीर नोटीस देईल. त्यानंतर, वृक्ष प्राधिकरण, अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीत सशर्त किंवा विनाशर्त परवानगी देऊ शकेल किंवा ती नाकारू शकेल. तथापि, अशी परवानगी देण्यात आल्यानंतर पंधरा दिवसांपर्यंत, कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही;

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ८ (फ) द्वारे ''रस्त्यांवर'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ३ (क) द्वारे ''समुद्र किनाऱ्यावर'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ९ (अ) (एक) द्वारे ''कोणत्याही व्यक्तीस एखादे झाड तोडावयाचे असल्यास'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) (दोन) द्वारे ''वृक्ष अधिकाऱ्याकडे'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ९ (अ) (तीन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

परंतु, वृक्ष प्राधिकरणाच्या मते, ते झाड मेलेले असेल किंवा त्यावर रोग पडला असेल किंवा वादळवाऱ्याने झाड पडले असेल तर किंवा त्यामुळे जीवितास वा मालमत्तेस धोका असल्यास किंवा त्यामुळे वाहतुकीस अडथळा होत असल्यास, आणि अशा परवानगीविरुद्ध कोणताही आक्षेप घेण्यात आलेला असेल तर, ती बाब पुनर्विचारासाठी वृक्ष प्राधिकरणासमोर मांडण्यात येईल व जिने आक्षेप घेतला असेल अशा व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, दोन आठवड्यांच्या आत निर्णय घेण्यात येईल.

(ख) वृक्ष प्राधिकरणाने, झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल, वृक्ष प्राधिकरण ज्याच्या अधिकारितेत काम करीत असेल त्या संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाला सहा महिन्यातून किमान एकदा सादर करण्यात येईल.]

[१][ (४) वृक्ष प्राधिकरणाने, त्याला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, किंवा या कालावधीत प्राधिकरणाने अर्ज मिळाल्याची पोचपावती दिलेली असेल तर अर्जाची पोचपावती दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, आपला निर्णय अर्जदारास कळविण्यात कसूर केली तर, ज्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आलेला असेल ती परवानगी दिली असल्याचे मानण्यात येईल.]

(५) एखादे झाड तोडण्यास परवानगी देण्यात आली असेल त्याबाबतीत, झाड तोडल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, किंवा [२][ वृक्ष प्राधिकरण ] याबाबतीत परवानगी देईल अशा, वाढविलेल्या मुदतीत त्याच जातीचे किंवा इतर [३][ योग्य त्या स्थानिक जातीचे झाड ] त्याच किंवा अन्य योग्य जागी अर्जदार लावील या शर्तीस अधीन राहून, वृक्ष अधिकाऱ्यास अशी परवानगी देता येईल.

**समुचित प्रमाणात झाडे लावण्यास फर्माविण्याचा अधिकार.**

**९.** (१) जर वृक्ष अधिकाऱ्याच्या मते, कोणत्याही जमिनीतील झाडांची संख्या ही कलम ७ च्या परिच्छेद (ग) अन्वये विहित करण्यात आलेल्या मानकांनुसार पुरेशी नसेल तर, वृक्ष अधिकाऱ्यास, जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशाद्वारे, त्यास आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणच्या जमिनीवर अशी झाडे किंवा अतिरिक्त झाडे लावण्यास फर्मावता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश काढण्यात आल्यावर जमिनीचा मालक किंवा भोगवटादार असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत त्याचे अनुपालन करील.

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ९ (क) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ (ड) (एक) द्वारे "वृक्ष अधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ (ड) (दोन) द्वारे "योग्य त्या जातीचे झाड" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

पडलेल्या किंवा नष्ट झालेल्या झाडाऐवजी नवीन झाड लावण्यास फर्माविण्याचा अधिकार.

**१०.** (१) वादळवारा, आग, वीज किंवा मुसळधार पाऊस यामुळे कोणतेही झाड पडले किंवा नष्ट झाले असल्यास, वृक्ष अधिकाऱ्यास स्वत: होऊन किंवा त्याला पुरविण्यात आलेल्या माहितीवरून, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर व झाड जेथे अस्तित्वात असेल त्या जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आदेशाद्वारे, अशा मालकाला किंवा भोगवटादाराला अशा पडलेल्या किंवा नष्ट झालेल्या झाडाऐवजी [१][ स्थानिक जातीचे] किंवा [२][ इतर स्थानिक जातीचे एक किंवा अधिक झाडे ] त्याच जागी किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर योग्य जागी लावण्यास फर्माविता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश काढण्यात आल्यावर, जमिनीचा मालक किंवा भोगवटादार असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, त्याचे अनुपालन करील.

झाडांचे जतन करण्याची जबाबदारी [६][आणि आदेशांचे योग्यरीत्या पालन व्हावे म्हणून ठेव घेण्याचा अधिकार.]

**११.** [३][ (१) ] [४][ ****** ] कलमे ८, ९ किंवा १० अन्वये आदेश काढल्यावर कलम १२ च्या तरतुदींना अधीन राहून ज्याला झाड लावण्याचा निदेश देण्यात आला आहे असा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार त्या झाडाची योग्य वाढ होत आहे [५][ आणि त्याचे चांगले जतन होत आहे हे पाहण्यास जबाबदार राहील व तो अशा झाडाच्या किंवा झाडांच्या स्थितीविषयीचा, तीन वर्षाच्या कालावधीसाठीचा अहवाल, सहा महिन्यांतून एकदा वृक्ष अधिकाऱ्याला देईल.] ज्या क्षेत्रामध्ये ती जमीन असेल अशा नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास त्या जमिनीवर अस्तित्वात असणाऱ्या इतर सर्व झाडांचे जतन करणे हे सुद्धा अशा मालकाचे किंवा भोगवटादाराचे कर्तव्य असेल.

[७][ (२) कलमे ८, ९ किंवा १० खाली आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, वृक्ष अधिकाऱ्यास [८][ कलमे ८, ९ किंवा १० अन्वये देण्यात आलेल्या ] आदेशाचे योग्यरीत्या पालन होईल हे सुनिश्चित करण्यासाठी तो याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशी रक्कम त्याच्याजवळ ठेव म्हणून ठेवण्याबद्दल जमिनीच्या मालकास, किंवा यथास्थिती, भोगवटादारास भाग पाडता येईल. ठेव म्हणून ठेवावयाची रक्कम ही विहित करण्यात येईल अशा रकमेहून अधिक असणार नाही ].

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १० (अ) द्वारे ''त्याच'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) द्वारे ''इतर जातीचे झाड'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ५ (१) द्वारे मूळ कलम ११ यास त्याचे पोट-कलम (१) असा क्रमांक देण्यात आला.

४. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ११ (अ) (एक) द्वारे ''वृक्ष अधिकाऱ्याने'' हा मजकूर वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) (दोन) द्वारे ''आणि त्याचे चांगले जतन होत आहे हे पाहण्यास जबाबदार राहील'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ५ (३) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) द्वारे पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

८. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ११ (ब) द्वारे ''त्याने केलेल्या'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१२.** (१) या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या, इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्याबाबतीत वृक्ष प्राधिकरण विनिर्दिष्ट करील अशा अटींना व शर्तींना अधीन राहून, वृक्ष प्राधिकरणास कोणत्याही व्यक्तीस किंवा निगम निकायास किंवा परिसंस्थेस, परवानगीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी, कोणतेही झाड दत्तक घेण्यास, लेखी परवानगी देता येईल आणि अशा कालावधीत उक्त झाडांचे परिरक्षण आणि जतन यासाठी उक्त व्यक्ती, निगम निकाय किंवा परिसंस्था जबाबदार राहील. झाडे दत्तक घेणे.

(२) [१]* * * * * कलमे ८, ९ व १० अन्वये, कोणताही आदेश दिला असेल त्याबाबतीत वृक्ष प्राधिकरणास नवीन झाड लावण्याऐवजी, लेखी परवानगी देऊन त्या परवानगीत विनिर्दिष्ट केलेले झाड दत्तक घेण्याची संबंधित व्यक्तीला मुभा देता येईल आणि त्यानंतर [२][ वृक्ष प्राधिकरण ] विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत त्या झाडाची परिरक्षा व त्यांचे जतन यासाठी ती व्यक्ती जबाबदार राहील :

[३][ परंतु, दत्तक घ्यावयाची झाडे ही एक वर्षापेक्षा कमी वयाची असली पाहिजेत आणि त्यांची संख्या ही कलम ८, पोट-कलम (५), कलम ९, पोट-कलम (१), किंवा यथास्थिती, कलम १०, पोट-कलम (१) अन्वये संबंधित व्यक्तीस, जितकी झाडे लावण्यास भाग पाडता आले असते त्या झाडांच्या संख्येहून कमी असणार नाहीत.]

**१३.** कोणत्याही जमिनीचा मालक आणि भोगवटादार [४][ कलमे ८, ९ किंवा १० अन्वये ] दिलेल्या कोणत्याही आदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर, [४][ यथास्थिती, वृक्ष प्राधिकरण किंवा वृक्ष अधिकारी ] अशा मालकास किंवा भोगवटादारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर [५][ ठेव पूर्णतः किंवा अंशतः वृक्ष प्राधिकरणाकडे जमा करू शकेल ] आणि या अधिनियमान्वये कसूरदाराविरुद्ध करता येईल अशा इतर कोणत्याही कारवाईस बाध न येता, [६]* * * आवश्यक ती कारवाई करू शकेल आणि त्यासाठी झालेला खर्च मालकाकडून किंवा यथास्थिती, भोगवटादाराकडून वसूल करू शकेल. [७][ अशा खर्चाच्या रकमेच्या वसुलीच्या प्रयोजनासाठी वृक्ष प्राधिकरणास [८][ किंवा वृक्ष अधिकाऱ्यास ] संपत्ती कराची थकबाकी वसूल करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा असा कर बसविण्यात आला नसेल त्या बाबतीत संबंधित अधिनियमान्वये नागरी स्थानिक प्राधिकरणाद्वारे बसविलेले सुधार आकार किंवा अशा इतर देय रकमांच्या थकबाकीच्या वसुलीच्या प्रयोजनासाठी नागरी स्थानिक प्राधिकरणास जे अधिकार आहेत तेच अधिकार असतील.] वृक्षारोपणाच्या आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास [९][ठेव सरकार जमा करणे आणि खर्च वसूल करणे.]

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १२ (क) द्वारे "वृक्ष अधिकाऱ्याने" हा मजकूर वगळण्यात आला.
२. वरील अधिनियमाच्या कलम १२ (ख) द्वारे "वृक्ष अधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ६ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
४. सन १९९६चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १३ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
६. वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) द्वारे "तो स्वतः" हा मजकूर वगळण्यात आला.
७. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ७ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
८. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १३ (ड) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
९. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ई) द्वारे "खर्च वसूल करणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अपिले. **१४.** (१) वृक्ष अधिकाऱ्याने कोणताही निर्णय घेतला असेल किंवा कलम [१]* * * ९ किंवा १० अन्वये कोणताही आदेश दिला असेल त्याबाबतीत, वृक्ष प्राधिकरणाकडे त्याविरुद्ध अपील करता येईल.

(२) जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला निर्णय कळविल्यापासून किंवा त्याला आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत अपील करण्यात येईल आणि त्यासोबत रुपये ५० एवढी फी जोडण्यात येईल.

(३) वृक्ष प्राधिकरण शक्य असेल तेथवर, अपिलकाराला स्वतःचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अपील मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत त्यावर निर्णय देईल. वृक्ष प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही :

परंतु, अपील वेळेवर दाखल केले असेल त्याबाबतीत, ज्याविरुद्ध अपील दाखल केले आहे त्या वृक्ष अधिकाऱ्याच्या आदेशात अनुपालनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची गणना, अपिलाचा निर्णय अपिलकाराच्या विरुद्ध गेल्याच्या दिनांकापासून करण्यात येईल आणि अपील मान्य केले असेल त्याबाबतीत, अपिलाबरोबर दिलेली रुपये ५० एवढी फी अपिलकारास परत करण्यात येईल.

## प्रकरण सहा

## वित्तव्यवस्था, अर्थसंकल्प आणि लेखे

वृक्ष प्राधिकरणाचा निधी. **१५.** संबद्ध कायद्यांमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नागरी स्थानिक प्राधिकरण, वृक्ष प्राधिकरण निधी नावाचा एक स्वतंत्र निधी निर्माण करील व त्यामध्ये वृक्ष प्राधिकरणास मिळणाऱ्या सर्व रकमा जमा करण्यात येतील. त्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल :--

[२][ (क) नागरी स्थानिक प्राधिकरणाकडून, त्याच्या उत्पन्नातून, विहित करण्यात येतील अशा करातून किंवा प्राधिकरणाकडून असे कर बसविण्यात आले नसतील त्या बाबतीत संबंधित कायद्यान्वये कोणताही सुधार आकार बसवलेला असल्यास त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नातून किंवा संबंधित कायद्यान्वये त्याने केलेल्या भूखंडाच्या विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नातून केलेले अंशदान. अंशदानाचे दर हे, राज्य शासनाकडून वेळोवेळी सर्वसामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे विहित करण्यात येतील असे असतील ;]

(ख) प्रकरण सात अन्वये उपकर बसवून त्याद्वारे उभारलेला सर्व पैसा ;

(ग) राज्य शासनाकडून वृक्ष प्राधिकरणाला देण्यात आलेले कोणतेही अनुदान ;

(घ) कोणत्याही व्यक्तीकडून, निगम निकायांकडून किंवा परिसंस्थांकडून वृक्ष प्राधिकरणास देणगी म्हणून मिळालेला सर्व पैसा ;

[३][ (ङ) या अधिनियमान्वये मिळालेला इतर कोणताही पैसा :

परंतु, वृक्ष प्राधिकरणाला वर विनिर्दिष्ट केलेल्या सर्व मार्गांनी मिळालेल्या एकूण जमा रकमा नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या एकूण जमा रकमांच्या अर्धा टक्क्यापेक्षा कमी असतील तर नागरी स्थानिक प्राधिकरण प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी तुटीची रक्कम वृक्ष प्राधिकरण निधीकडे जमा खाती घालील.]

---

[१]. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १४ द्वारे "८" हा आकडा वगळण्यात आला.

[२]. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ८ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३]. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १५ द्वारे खंड (ङ) जादा दाखल करण्यात आला.

१६. प्रत्येक वृक्ष प्राधिकरण, प्रत्येक वर्षाच्या ३१ ऑक्टोबर रोजी किंवा तत्पूर्वी, नागरी स्थानिक प्राधिकरण विहित करील अशा नमुन्यात, वृक्ष प्राधिकरणाच्या आगामी वित्तीय वर्षातील अंदाजित प्राप्तीचे आणि खर्चाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील आणि संबद्ध कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नागरी स्थानिक प्राधिकरणास मान्यतेसाठी आणि त्या प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पीय अंदाजात त्यांचा अंतर्भाव करण्यासाठी ते सादर करील. अर्थसंकल्प.

१७. नागरी स्थानिक प्राधिकरणाचे लेखे ठेवण्यासाठी आणि त्याच्या लेखापरीक्षेसाठी लागू असणारी संबद्ध कायद्यामधील कार्यपद्धती ही योग्य त्या फेरफारासह प्रत्येक वृक्ष प्राधिकरणाचे लेखे ठेवण्यास आणि त्यांच्या लेखापरीक्षेस लागू असेल. लेखे आणि लेखापरीक्षा.

## प्रकरण सात

## वृक्ष उपकर

१८. (१) संबद्ध कायद्यान्वये जेथे नागरी स्थानिक प्राधिकरण इमारतीवर आणि जमिनीवर मालमत्ता कर बसवित असेल तेथे, संबद्ध कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वृक्ष प्राधिकरणाने विनंती केल्यास या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी इमारतीवर आणि जमिनीवर उक्त प्राधिकरण ठरवील अशा मालमत्तेच्या करपात्र मूल्याच्या एक टक्क्याहून अधिक नसणाऱ्या दराने "वृक्ष उपकर" नावाचा अतिरिक्त कर अशा प्राधिकरणाने बसवणे कायदेशीर असेल. वृक्ष उपकर बसवणे व त्याची वसुली.

(२) संबद्ध अधिनियमान्वये मालमत्ता कर बसविणे व त्याची वसुली यासाठी विहित केलेली कार्यपद्धती ही, योग्य त्या फेरफारासह पोट-कलम (१) अन्वये लादलेला उपकर बसविण्यास व त्याची वसुली करण्यास लागू असेल.

## प्रकरण आठ

## संकीर्ण

१९. संबद्ध कायद्यामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी :-- वृक्ष अधिकाऱ्याच्या मान्यतेने जमिनीच्या विकासासाठी परवानगी देणे.

(क) जमिनीच्या विकासासाठी परवानगी देण्याचा अधिकार सोपवण्यात आलेल्या नागरी प्राधिकरणाचा कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी अशा जमिनीवर झाडे लावणे आणि त्यांचे जतन करणे याबाबतीत वृक्ष अधिकाऱ्याने कोणत्याही शर्ती लादलेल्या असल्यास त्यांना अधीन राहून आणि त्यांच्या मान्यतेनेच अशी परवानगी देईल ;

(ख) ज्या शर्तींना अधीन राहून पूर्वोक्तप्रमाणे जमिनीच्या विकासासाठी परवानगी देण्यात आली असेल अशा शर्तींचे पालन झाले आहे अशी, असे प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्याशिवाय, कोणत्याही इमारतीच्या बाबतीत संबद्ध कायद्यान्वये कोणतेही समाप्तीचे किंवा भोगवट्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

२०. वृक्ष प्राधिकरणास वेळोवेळी वृक्ष अधिकाऱ्याला किंवा इतर अधिकाऱ्यांना आणि आपल्या हाताखालील दुय्यम कर्मचाऱ्यांना, त्याला आवश्यक वाटतील असे, त्यांची कर्तव्ये पार पाडताना त्यांनी अनुसरावयाच्या धोरणाबद्दल आणि या अधिनियमाची प्रयोजने प्रभावीपणे पार पाडण्यासाठी सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देता येतील आणि असे अधिकारी व कर्मचारी अशा निदेशांचे पालन करतील. निदेश देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा अधिकार.

झाडे तोडण्यास किंवा त्यांस हानी पोहचविण्यास प्रतिबंध.

[1][ **२०-क.** वृक्ष अधिकाऱ्यास किंवा नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या बाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, कोणतेही झाड तोडण्याला किंवा त्यास हानी पोहचविण्याला प्रतिबंध करण्याकरिता किंवा कोणत्याही झाडाचे रक्षण करण्याकरिता वाजवीरीत्या आवश्यक असतील असे उपाय योजता येतील किंवा अशा बळाचा वापर करता येईल.

या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी प्रवेश करण्याचा अधिकार.

**२०-ख.** (१) वृक्ष अधिकाऱ्याने किंवा त्याने अथवा वृक्ष प्राधिकरणाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने या अधिनियमाची यथोचितरीत्या अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास योग्य वाटेल अशा सहायकांसह कोणत्याही सार्वजनिक जागेत प्रवेश करणे, त्यासाठी इष्ट अशी तपासणी करणे, इष्ट असे उपाय योजणे आणि इष्ट अशा बळाचा वापर करणे [2][ हे ] कायदेशीर असेल.]

[3] * * * * * * * * * * *

[7][अपराध व शास्ती.]

**२१.** [4][ (१) ] [5][ अधिनियमाच्या ] तरतुदींचे उल्लंघन करून जी कोणतीही व्यक्ती कोणतेही झाड तोडील किंवा कोणतेही झाड तोडण्यास कारणीभूत होईल किंवा [6][ वृक्ष अधिकाऱ्याने किंवा वृक्ष प्राधिकरणाने लादलेल्या शर्तींचे किंवा दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात वाजवी सबबीशिवाय कसूर करील किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्यास किंवा वृक्ष अधिकाऱ्यास किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास या अधिनियमाखालील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात स्वेच्छेने अडथळा आणील त्या व्यक्तीला अपराधसिद्धीनंतर, प्रत्येक अपराधाकरिता एक हजार रुपयांपेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणि एक आठवड्यापेक्षा कमी नसेल व एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाचीदेखील शिक्षा होईल :

परंतु, या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, राज्य किंवा केंद्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने काम सुरू केलेल्या सार्वजनिक रस्त्यांवरील किंवा त्यांच्याकडेने असलेली झाडे तोडण्याच्या संबंधात लागू होणार नाही.]

[8][ (२) वृक्ष प्राधिकरणाची परवानगी घेतल्याशिवाय झाड तोडण्याची किंवा झाड तोडण्यास कारणीभूत होण्याची प्रत्येक कृती हा स्वतंत्र अपराध ठरेल.]

---

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ९ द्वारे कलमे २०-क आणि २० ख समाविष्ट करण्यात आली.

२. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १६ (अ) द्वारे "पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून अधिकाऱ्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले.

४. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १० (१) द्वारे या कलमास त्याचे पोट-कलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात आला.

५. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १७ (अ) (एक) द्वारे "कलम ८ च्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम १७ (अ) (दोन) द्वारे "वृक्ष अधिकाऱ्याने" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "शिक्षा होईल" या शब्दांनी समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम १७ (क) द्वारे समासटीपेमध्ये "शास्ती" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

**२२.** (१) राज्य शासनास पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून आणि **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील, किंवा यथास्थिति, येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.